<u>*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :- १६३/२०२३/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. शरद रामदास महाले<br>रा. रो हाऊस नं.१०, चिंतामणी पार्क,<br>चक्रधर नगर, पंचवटी,<br>नाशिक, ता.जि.नाशिक | गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय,<br>साक्री, ता. साक्री,<br>जि. धुळे |

**<u>सुनावणी दिनांक १४/१२/२०२३</u>**

तक्रारदार यांनी दिनांक २०/०२/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक १४/१२/२०२३ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित असुन जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक २०/०२/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार अद्यापपावेतो कुठलीही माहिती उपलब्ध करून दिली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्र २७०/२०२१/धुळे संदर्भात दि २८/११/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(८)क(२) नुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले असल्याने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६/११/२०२० रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी सेवा पुस्तकाची माहिती वगळून उर्वरीत माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

४) सुनावणीपूर्वी प्रस्तुतच्या तक्रार अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अद्यापही आयोगास दि. ०९/०३/२०२३ अन्वये गटविकास अधिकारी पंचायत समिती साक्री ता.साक्री, यांचेकडुन प्राप्त झालेला आहे.

५) सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री, ता.साक्री यांनी तक्रारदारास आयोगाने दिलेल्या आदेशानुसार दि. ०९/०३/२०२३ च्या पत्रान्वये रजिस्टर पोस्टाने त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. त्यामुळे सदरची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक १६३/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

0 6 MAR 2024